जा.क्र./पोउआ/वाह/6035 /१७

प्रेसनोट

पुणे दिनांक - ०८ / ०८/२०१७

पुणे शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन प्राप्त हरकती व सुचनांचा विचार करून मी अशोक मोराळे पोलीस उप-आयुक्त, वाहतुक नियंत्रण शाखा, पुणे शहर, यापुर्वी या ठिकाणी अं.आ.क्र.१५/२०१५ दि.०५/०२/२०१४ अन्वये मुंढवा खराडी बायपास रोडवर (मगरपट्टा रोडवर) सर्व प्रकारची ट्रॅक्टर - ट्रेलर कॉम्बीनेशन, ट्रक-ट्रेलर कॉम्बीनेशन, अर्टीक्युलेटेड व्हेहीकल्स, मल्टी अॅक्सल वाहने, कंटेनर, मोठया आकाराची मालाची वाहतुक करणारी वाहने तसेच कॉन्ट्रॅक्ट कॅरेज प्रकारची प्रवासी (मल्टी अॅक्सल) वाहनांना सकाळी ०८/०० ते ११/०० वा. पर्यंत व सायं.१७/०० ते २०/०० वा. प्रवेश बंद करण्याचे आदेश निर्गमित करण्यात आले होते ते रद्द करण्यात येत असुन तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

तरी नागरीकांनी याबाबत आपल्या काही सुचना असल्यास त्या पोलीस उप-आयुक्त, वाहतूक नियंत्रण शाखा, साधु वासवानी रोड, पुणे - १ यांचे कार्यालयात दिनांक - /०८/२०१७ ते दिनांक - /०८/२०१७ पर्यंत लेखी स्वरूपात कळवाव्यात. नागरीकांच्या सूचन व हरकती विचार करुन व अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका, इ.) खेरीज करून अंतिम आदेश काढण्यात येतील.

## हडपसर वाहतुक विभाग पुणे अंतर्गत,

**मुंढवा –खराडी बायपास रोडवर (मगरपट्टा रोडवर) सर्व प्रकारची ट्रॅक्टर - ट्रेलर कॉम्बीनेशन, ट्रक-ट्रेलर कॉम्बीनेशन, अर्टीक्युलेटेड व्हेहीकल्स, मल्टी अॅक्सल वाहने, कंटेनर, मोठया आकाराची मालाची वाहतुक करणारी वाहने तसेच कॉन्ट्रॅक्ट कॅरेज प्रकारची प्रवासी (मल्टी अॅक्सल) वाहनांना सकाळी ०८/०० ते १२/०० वा. पर्यंत व सायं.१७/०० ते २१/०० वा. प्रवेश बंद करण्यात येत आहे.**